# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


मविनिआ/ ९३७५ दिनांक - १९.०१.२०१६

प्रति,
श्री.जतीन बी.शहा,
व्दारा बी.बालुभाई,
२,भांगवाडी, शॉपिंग ऑर्केड,
काळबादेवी,
मुंबई - ४०० ००२.

विषय:- आपले दि.०१.१२.२०१५ चे मा.सचिव मविनिआ, मुंबई यांना लिहिलेले पत्र.

सदंर्भ:- माहिती अधिकार कायद्याअंतर्गत या कार्यालयाची आपणांस उपलब्ध करुन दिलेली माहिती.

वरील संदर्भांकित विषयानुसार आपण माहिती अधिकार कायद्याअंतर्गत आपणांस प्रकरण क्र.१०४/२०१५ व प्रकरण क्र.१०५/२०१५ यात सविस्तर माहिती न मिळाल्याचे आपण आपल्या दि.०१.१२.२०१५ च्या पत्रानुसार मा.सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांना कळविले आहे.

वरील प्रकरणात आपण प्रथम अपिल या कार्यालयात दाखल केलेले आहे. त्या अपिलात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०१.२०१६ रोजी आदेश पारित करुन आपल्याला आदेशाची प्रत रवाना केलेली आहे. आपल्या वरील पत्राचा विषय हा माहिती अधिकाराअंतर्गत असून तो वरील अपिलातील मुद्यांना अनुसरुन आहे. सबब अपिल निकाली काढले असून आपल्याला माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच, माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.मविनिआ/माअअ/प्रक्र.१०४/२०१५/१०१८ दि.३०.११.२०१५ नुसार आपल्याला या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे.

माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आपले प्रकरण निकाली काढलेले आहे व आपणांस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तीच माहिती आपण आपल्या दि.०१.१२.२०१५ रोजी मा.सचिव, मविनिआ, मुंबई यांना पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने आहे.

करिता या पत्रान्वये आपल्या माहितीकरिता सादर

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in